लोकमत

# विद्यापीठात खांडेकर यांचा स्मृतिदिन

कोल्हापूर : ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यक वि. स. खांडेकर यांचा ४७ वा स्मृतिदिन शिवाजी विद्यापीठात शनिवारी वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालयात साजरा झाला. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालिका डॉ. निलांबरी जगताप, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते.

पुण्यनगरी

# तैवान युनिव्हर्सिटी चेअर प्रोफेसरपदी डॉ. प्रमोद पाटील

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची तैवान येथील नॅशनल डोंग विद्यापीठाच्या



मानद युनिव्हर्सिटी चेअर प्रोफेसरपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड एक वर्षासाठी असून, विद्यापीठाचे अध्यक्ष हान चिह चाओ यांनी नुकतेच नियुक्तीचे पत्र प्रदान केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे सेमीकंडक्टर डिव्हाईसेस तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने तेथील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठ व नॅशनल डोंग विद्यापीठामध्ये संशोधन साहचर्य वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची संधी आहे. प्र- कुलगुरू डॉ. पाटील यांना मिळालेल्या या महत्त्वपूर्ण संधीबद्दल कुलपती रमेश बैस आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

लोकमत

# 'दूरशिक्षण'च्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम, एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी. (गणित), आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

विद्यापीठाच्या ऑनलाइन लिंकवर आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्रा.डॉ.डी.के. मोरे यांनी केले

पुढारी

# दूरशिक्षण विभाग प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे २०२३ ते २०२४ या शैक्षणिक वर्षासाठी बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि. ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी दिली.

डॉ.मोरे म्हणाले की, दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासकेंद्रांच्या प्रवेश प्रक्रियेस विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामुळे जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, शिवाय महाविद्यालयास तुकडी मान्यता न मिळाल्याने, तसेच बारावी पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एकूण ८७ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे.

नवराष्ट्र भारत

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रवेशाला मुदतवाढ

## ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेण्यास मुदतवाढ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ ची बी. ए., बी. कॉम, एम. ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासकेंद्रांच्या प्रवेश प्रक्रियेस विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यामुळे जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, शिवाय महाविद्यालयास तुकडी मान्यता न मिळाल्याने, तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकताच १२ वी रिपीटरच्या विद्यार्थ्यांचा पुरवणी निकाल जाहीर केलेला आहे.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८७ अभ्यासकेंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खाजगी कंपन्या आदिनी आपला प्रवेश निश्चित करावा. ऑनलाईन लिंकवर आपला प्रवेश निश्चित करावा. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालय व मुक्त विद्यापीठामध्ये प्रवेशित झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचा ही लाभ मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित व्हावे. अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापिठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन दूरशिक्षणच्यावतीने केले आहे.

- 3 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योगशास्त्र अभ्यासक्रमामुळे देश-विदेशात रोजगाराची संधी

## योगतज्ज्ञ कृष्णा जोशी : शिवाजी विद्यापीठात एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

योगा अभ्यासाला देश-विदेशात लोकप्रियता मिळत आहे. योगशास्त्राची पदवी मिळवून योगाचा प्रचार, पसार व रोजगाराची संधी शिवाजी विद्यापीठातील एम. ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमामुळे निमार्ण झाली आहे, असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ योगतज्ज्ञ कृष्णा जोशी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.



वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन व व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

योगतज्ज्ञ जोशी म्हणाले, निरोगी जीवन जगण्यासाठी योगाभ्यास उपयोगी आहे. आसन, प्राणायम व ध्यानधारणा यांच्या संयुक्त अभ्यासामुळ आरोग्यसंपन्न जीवन जगता येते. योगासने हे योग्य पध्दतीने केले तरच त्याचे मोठया प्रमाणात फायदे मिळतात. मानसिक आरोग्य सुदृढ बनते. तणाव दूर करण्यासाठी योगाकडे एक औषध म्हणून पाहिले पाहिजे असल्याचे सांगितले.

चंद्रकांत कांबळे यांनी योग नृत्य सादर केले. संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी प्रास्ताविक केले. योगशिक्षक आसावरी कागवाडे आणि प्रिती चव्हाण यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कानिफनाथ पंढरे यांनी आभार मानले.

यावेळी दत्तात्रय पाटील, रविंद्र खैरे, सूरज पाटील, राजेंद्र जाधव आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर डॉ. सपकाळे, डॉ. मैंदर्गी

## विकास आघाडीचे वर्चस्व कायम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर विद्या परिषदमधून निवडून द्यावयाच्या दोन सदस्यांसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया झाली. यामध्ये शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या सदस्यांनी बाजी मारली. व्यवस्थापन परिषदेवर डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. वर्षा मैंदर्गी विजयी झाले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर प्राचार्य अर्जुन जाधव हे निवडून आले.

विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेतून निवडून द्यावयाच्या दोन जागांपैकी शिक्षक गटात डॉ. जगदीश सपकाळे व डॉ. सुनील चव्हाण यांच्यामध्ये लढत झाली. सपकाळे हे विकास आघाडीशी, तर डॉ. चव्हाण हे शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाशी (सुटा) निगडित आहेत. डॉ. जगदीश सपकाळे यांना २६, तर चव्हाण यांना १६ मते मिळाली.

महिला गटातील एका जागेसाठी विकास आघाडीकडून डॉ. वर्षा मैंदर्गी, तर सुटाकडून डॉ. रूपाली संकपाळ असे उमेदवार रिंगणात होते. यामध्ये मैंदर्गी यांना २९, तर संकपाळ यांना १२ मते मिळाली. एक मत बाद झाले. महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर विद्या परिषदेमधून एक सदस्य पाठवायचा होता. यामध्ये विकास आघाडीकडून प्राचार्य अर्जुन जाधव व सुटाकडून डॉ. रूपाली संकपाळ उमेदवार होते. यामध्ये प्राचार्य जाधव निवडून आले. प्राचार्य जाधव यांना २७ मते, तर रूपाली संकपाळ यांना १५ मते मिळाली. शनिवारी झालेल्या तिन्ही जागांवर विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले. विद्या परिषदेवर विकास आघाडीची सदस्य संख्या लक्षणीय आहे. त्यांना जादा मताधिक्याने विजय अपेक्षित होता; मात्र विकास आघाडीची चार ते पाच मते विरोधी सुटा संघटनेच्या उमेदवारांना मिळाल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

सकाळ

# व्यवस्थापन परिषदेवर सपकाळे, मैंदर्गी विजयी

## विद्यापीठ विकास आघाडीचे वर्चस्व कायम

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर विद्या परिषदमधून डॉ. जगदीश सपकाळे व डॉ. वर्षा मैंदर्गी निवडून आले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर प्राचार्य अर्जून जाधव निवडून आले. तिघेही शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे सदस्य आहेत. या जागांसाठी आज मतदान प्रक्रिया झाली.

विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेतून निवडून द्यावयाच्या दोन जागापैकी शिक्षक गटात डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. सुनील चव्हाण यांच्यात लढत झाली. सपकाळे यांना २६ तर चव्हाण यांना १६ मते मिळाली. सपकाळे विकास आघाडीचे व डॉ. चव्हाण शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाशी (सुटा) संबंधित आहेत.

महिला गटातील एका जागेसाठी विकास आघाडीकडून डॉ. मैंदर्गी, तर सुटाकडून डॉ रूपाली संकपाळ होत्या. मैंदर्गी यांना २९ तर संकपाळ यांना १२ मते मिळाली. एक मत बाद झाले. महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर विद्या परिषदमधून एक सदस्य पाठवायचा होता. विकास आघाडीकडून प्राचार्य अर्जून जाधव व सुटाकडून डॉ. रूपाली संकपाळ उमेदवार होते. यामध्ये प्राचार्य जाधव निवडून आले. प्राचार्य जाधव यांना २७ मते तर संकपाळ यांना १५ मते मिळाली.

तरुण भारत

# ऋत्विक सुतारची इंग्लंडमध्ये उच्चशिक्षणासाठी निवड



मुरगूड : येथील ऋत्विक सुतार याची इंग्लंड येथील टिससाईड युनिव्हर्सिटीत फूड टेक्नॉलॉजी विषयातील उच्च शिक्षण (एम. ए स स ा ा ॅ. ) अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. पुणे येथील एज्युअलायन्स एज्युकेशनल कन्सल्टन्सीच्या कोल्हापूर शाखेमार्फत या अभ्यासक्रमासाठी त्यांने परीक्षा दिली होती. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाणारा तो परिसरातील पहिलाच विद्यार्थी ठरला आहे.

ऋत्विकचे प्राथमिक शिक्षण येथील जीवन शिक्षण विद्या मंदिर शाळेत तर माध्यमिक शिक्षण कागलच्या जवाहर नवोदय विद्यालयात झाले आहे. उच्च माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या गोपाळकृष्ण गोखले कॉलेजमध्ये झाले. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातून (फूड डिसाईड युनिव्हर्सिटीत टेक्नॉलॉजी ) बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी (बी.टेक.) पदवी संपादन केली.

इंग्लंडमधील टिससाईड युनिव्हर्सिटीत फूड प्रोसेसिंग इंजीनियरिंग विथ ॲडव्हान्स प्रॅक्टिस या विषयात तो एम. एस्सी. करणार आहे. ऋत्विकला वडील प्रा. महादेव सुतार, आई शिक्षिका भारती सुतार, भाऊ ऋषिकेश सुतार, शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.